एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना अंतर्गत अंगणवाडयांकरीता "प्लॅस्टिक चटई" पुरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.७०/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५

वाचा :- १) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र जा.क्र. एबाविसेयो/ब.व पुनर्संरचना/अंगणवाडी/३३२/२०१५, दिनांक १३.०२.२०१५
२) महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांचे पत्र क्र.SPC/RCT/Plastic Mats/०५/२०१४-१५C-९६१, दिनांक ११.०२.२०१५

प्रस्तावना :- सन २०१४-१५ या चालू आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने मंजूर केलेली एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना ही नवीन योजना २० जिल्हयांसाठी लागू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांसाठी उपयुक्त साहित्य खरेदी करण्यासाठी अनुदान उपलब्ध आहे. या योजनेअंतर्गत प्रति अंगणवाडी केंद्र रु.७,०००/- व प्रति मिनी अंगणवाडी केंद्र रु.५,०००/- एवढे अनुदान प्रत्येक ५ वर्षानंतर एकदा प्रति अंगणवाडी केंद्रासाठी साहित्य खरेदीसाठी उदा. दरीपंजा, भांडी, इ. करीता तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबतचे केंद्र शासनाकडून निकष ठरविण्यात आले आहेत. या तरतूदीतून नागरी प्रकल्पातील ६३५१ अंगणवाडी केंद्राना "प्लॅस्टिक चटई" पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत नागरी प्रकल्पातील ६३५१ अंगणवाडी केंद्रांना १२ फूट x १५ फूट आकाराच्या (प्रति नग रु.१४२२/-दराप्रमाणे) "प्लॅस्टिक चटई" प्रति केंद्र २ नग प्रमाणे महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांचे पत्र क्र. SPC/RCT/Plastic Mats/०५/२०१४-१५C-९६१, दिनांक ११.०२.२०१५ मध्ये नमूद केल्यानुसार १२ फूटx१५ फूट आकाराची "प्लॅस्टिक चटई" रु.१४२२/- दरनिश्चितीनुसार व त्यातील विनिर्देशानुसार (Specification नुसार) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांनी मे. भवानी एंटरप्रायझेस जिंतूर, जि.परभणी यांच्याशी करण्यात आलेल्या दरनिश्चितीनुसार खरेदी करण्यासाठी लागणारा रु.१,८०,६२,२४४/- (रुपये एक कोटी ऐंशी लाख बासष्ट हजार दोनशे चोवीस फक्त) एवढा निधी सन २०१४ - १५ या आर्थिक वर्षासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना दरकरारातील दर व विनिर्देश (Specification) च्या अधिन राहून उपलब्ध करुन देण्यास शासन मंजूरी देत आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | साहित्याचा प्रकार | प्रकल्पाचा प्रकार | एकूण अंगणवाडी केंद्र संख्या | प्रति अंगणवाडी केंद्र २ नग याप्रमाणे पुरवठा करावयाच्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | प्रति दरीपंजा किंमत रुपये | एकूण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२ फूट x १५ फूट आकाराची प्लॅस्टिक चटई | नागरी प्रकल्प | ६३५१ | १२७०२ | १४२२/-<br>रु.८५/- प्रति चौरस मीटर | १,८०,६२,२४४/- |
| | | एकूण | ६३५१ | १२७०२ | ----- | १,८०,६२,२४४/- |

२. "प्लॅस्टिक चटई" खरेदी करतांना खालील अटी विचारात घेण्यात याव्यात :-

i) "प्लॅस्टिक चटई" ही [तपशिल : १२ फूट x १५ फूट आकाराची किंमत प्रति चौरस फूट रुपये ७.९०] या स्वरुपात राहील.

ii) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी वरील "प्लॅस्टिक चटई" चा पुरवठा विहीत नमुन्याप्रमाणे (Sample, specification) असल्याची खात्री करुन त्याबाबतचा अहवाल आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना सादर करावा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी एकत्रित अहवाल महिला व बाल विकास विभागास सादर करावा.

iii) "प्लॅस्टिक चटई" मागणी व पुरवठा उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांनी दरनिश्चितीच्या परिपत्रकात/ दरकरार पत्रकात केल्याप्रमाणे केला जाईल व त्यातील दरनिश्चितीच्या परिपत्रकात/ दरकरारपत्रकात नमूद केलेले प्रकार व विनिर्देश व अटींची पुर्तता काटेकोरपणे केली जाईल याची दक्षता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी घ्यावी.

iv) सदर वस्तूंचा पुरवठा पुरवठाधारकामार्फत प्रकल्पस्तरावर करण्यात यावा. सदर पुरवठा प्रकल्प स्तरापर्यत वेळेवर होईल याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी योग्य ती दक्षता घ्यावी. सदर वस्तूंचा पुरवठा प्रकल्पस्तरापर्यंत झाल्याची पोच मिळाल्यानंतरच देयके अदा करण्यात यावीत.

v) सदर वस्तूंचे खरेदी, वाटप, पुरवठा व विनियोगामध्ये काही अनियमितता झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील.

vi) वरीलप्रमाणे "प्लॅस्टिक चटई" ही पुरवठा झाल्यानंतर त्याचा वापर अंगणवाडी केंद्रातील लाभार्थी नियमीतपणे करतील याची योग्य ती काळजी घेण्यात यावी.

३. यासाठी होणारा खर्च हा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत प्रति अंगणवाडी केंद्र रु.७,०००/- व प्रति मिनी अंगणवाडी केंद्र रु.५,०००/- या बाबी अंतर्गत खालील लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवून त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३३

आ) नागरी प्रकल्पांसाठी :- १,८०,६२,२४४/-

१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - रु.१,६२,५६,०२०/-

लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (११) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १६१३) २१ सामुग्री व पुरवठा

२) राज्य शासनाचा १०% हिस्सा - रु.१८,०६,२२४/-

लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (१२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६२२) २१ सामुग्री व पुरवठा या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागवून, त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ १११/व्यय-६, दिनांक ३०.०१.२०१५ व महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१२/प्र.क्र.४३६/का.६, दिनांक ११.०२.२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ , मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहायक संचालक (वित्त व लेखा), एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
मे. भवानी एंटरप्रायझेस जिंतूर, जि.परभणी
महिला व बाल विकास विभाग, कार्यासन क्र.४ (अर्थसंकल्प)
निवड नस्ती (कार्या.६)

निर्गमित
दिनांक: २३/०२/२०१५